एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

(स्वयं अर्थसहाय्यित)

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय

आयोजक

## मराठी विभाग

श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी (कॅम्प) द्वारा संचलीत

(भाषिक अल्पसंख्यांक (मारवाडी) दर्जा प्राप्त)

## तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सेनगांव जि. हिंगोली (महाराष्ट्र) - ४३१५४२




संयोजक

प्रा. डॉ. अंजली. द. टापरे

मराठी विभाग

समन्वयक

प्रा.उत्तम. पुं. सुपारे

मराठी विभाग प्रमुख

प्रा.श्रीपाद. ग. तळणीकर

प्र. प्राचार्य

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्या पुढील आव्हाने व उपाय


संपादक

प्रा.यु.पी. सुपारे

मराठी विभाग प्रमुख



* प्रकाशक *

प्र.प्राचार्य प्रा.एस.जी. तळणीकर

तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव

जि.हिंगोली

फोन : (०२४५६) २०२४६५, २५०४६२

www.toshniwalacs.com | E-mail : prin.taccs212@rediffmail.com

प्रथम आवत्ती : ०४ जानेवारी २०२०

ISBN : 978-1-79482-974-9

* मुद्रक *

महेश ऑफसेट, परभणी

मूल्य : २५०/-



या पुस्तकातील सर्व शोधनिबंध लेखकाची मौखिल परवानगी ग्राह्य धरूनच हे शोधनिंबंध एकत्रित करण्यात आले असून, त्या मतांशी संपादक व प्रकाशनक सहमत असतीलच असे नाही.

या पुस्तकाचे सर्व अधिकार प्रकाशनाधीन असून या पुस्तकातील कोणताही मजकूर, तक्ता किंवा तत्सम संकल्पना यांची कोणत्याही प्रकारे नक्कल करणे किंवा यांत्रिकी साधनांनी फोटो कॉपी, रेकॉर्डींग करणे कायद्याने गुन्हा असून असे आढळून आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल.

| अ.क्र. | शिर्षक | लेखकाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 39 | जागतिकीकरण आणि आंबेडकरी कविता | पंजाब पुंजाजी टापरे | 139 |
| 40 | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण साहित्य | प्रा.डॉ.मारोती भोसले, | 142 |
| 41 | जागतिकीकरण – भाषा आणि संस्कृती एक चिंतन. | प्रा.राजू संभा धुळे | 145 |
| 42 | जगतिकीकरणाचा मराठी ग्रामीण साहित्यावर झालेला परीणाम | प्रा. डॉ. पंडीत शिंदे . | 147 |
| 43 | जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य | प्रा. संध्या जंजाळ | 149 |
| 44 | जागतिकीकरणात मराठी भाषेचे बदलते स्वरूप | प्रा.शेजवळ जितेंद्र बाबुराव | 152 |
| 45 | आसाराम लोमटे यांच्या साहित्यावरील जागतिकीकरणाचा प्रभाव | संजय नामदेवराव आटवले | 155 |
| 46 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा.डॉ. दिलीप सावंत | 160 |
| 47 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | सुरेश देवचंद शिरसाट | 163 |
| 47 | मराठवाड्यातील शेतकरी : जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता | डॉ. मारोती माधवराव घुगे | 165 |
| 48 | जागतिकीकरण आणि कविता | प्रा. डॉ. किरण वाघमारे | 169 |
| 49 | ग्रामीण कादंबरी विष्वातील जागतिकीकरण | प्रा.डॉ. रामदिनेवार गोविंद | 175 |
| 50 | जागतिकीकरण : मराठी भाषा आणि साहित्य | डॉ. भास्कर श्रावण गायकवाड | 179 |
| 51 | जगतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ. नवीन के. गिलबिले | 182 |
| 52 | जगतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | रा.ज. चाटे | 185 |
| 53 | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण् कादंबरी | प्रा.प्रमोद भ. इंगोले | 189 |
| 54 | जागतिकीकरण, शेतकऱ्यांचे प्रश्न वशेतकरी संघटना | प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत | 192 |
| 55 | जागतिकीकरण आणि कविता | मारोती रामराव कोल्हे | 195 |
| 56 | जागतिकीकरण आणि दलित साहित्य | डॉ.रविंद्र आ.गायके | 197 |
| 57 | भारतीय संविधान आणि भाषा | प्रा. वाघमारे के.एच | 200 |
| 57 | जागतिकीकरण आणि दलित साहित्य | डॉ. शत्रुघ्न जी. जाधव | 203 |
| 58 | जगतिकीकरण आणि आदिवासी समाज | प्रा. सुनिता बोंबे पाटील | 207 |
| 59 | जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव | पंजाब लक्ष्मण शेरे | 209 |
| 60 | जागतिकीकरण आणि कविता | प्रा.डॉ. श्रीराम कऱ्हाळे | 211 |
| 61 | जागतिकीकरण आणि ग्रामिण साहित्याचे बदलते संदर्भ | प्रा. पंडित किशनराव मोरे | 213 |
| 62 | जागतिकीकरणातील माझी कविता : एक आकलन | डॉ. लहू दिगंबर वाघमारे | 216 |
| 63 | जागतिकीकरणाचा महानगरीय मराठी कवितेवरील प्रभाव | डॉ. संगिता ग. घुगे | 220 |
| 64 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | कु. हागे शिल्पा नारायण | 223 |
| 65 | जागतिकीकरण आणि दलित साहित्य | शरद वसंता नरवाडे | 226 |
| 66 | मराठी भाषा सद्यस्थिती आव्हाने व उपाय | कु. वैद्य किरण रामराव | 228 |
| 67 | जागतिकीकरण आणि कादंबरी | अनिल किसन राउत | 231 |
| 68 | जागतिकीकरण आणि ग्रामीण कादंबरीतील समाज जीवन | कु.स्वाती मुकूंदराव वाईकर | 233 |
| 69 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | वाकळे प्रभावती दत्तराव | 236 |
| 70 | जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव | प्रा. सुपारे यु.पी. | 240 |
| 71 | जागतिकीकरण मराठी भाषा आणि साहित्य | डॉ. अंजली द. टापरे | 243 |
| 72 | जागतिकीकरण आणि आंबेडकरी कविता | डॉ. राजीवर पैठणकर | 245 |
| 73 | जागतिकीकरण व मराठी भाषा | प्रा. शिंदे एच.टी. | २४७ |
| 74 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | फड संजय बाबुराव | 249 |
| 75 | जागतिकीकरणाचा लोकसाहित्यावरील प्रभाव व परीणाम | शेळके रंगनाथ माणिकराव | 253 |
| 76 | जागतिकीकरण आणि कादंबरी | विलास चुडामण बोथीकर | 255 |
| 77 | जागतिकीकरणातील माझी कविता : एक आकलन | डॉ. लहू दिगंबर वाघमारे | 258 |

# जागतिकीकरण : मराठी भाषा आणि साहित्य

**डॉ. भास्कर श्रावण गायकवाड**
मराठी विभाग प्रमुख,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

आज जागतिकीकरण या शब्दाला फारच महत्व् प्राप् झालेले आहे. जागतिकीकरणाची ही प्रक्रिया फार वैविध्यपूर्ण स्वरूपाची आहे, त्यामुळे त्याचे पडसाद संपूर्ण जगावरच उमटलेले पहावयास मिळतात. त्याने सर्वच क्षेत्र व्यापलेले आहे. सामाजिक, राजकिय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि साहित्याचे क्षेत्र सुध्दा या जागतिकीकरणामुळे पुरते बाधित झाले आहे. जागतिकीकरणाच्या बाजूने आणि विरोधात भरपूर लिखाण झालेले आहे, त्यातून एक गोष्ट निश्चित जाणवते ती म्हणजे जागतिकीकरण ही एक अटळ गोष्टा आहे. आणि त्याचा प्रभाव जगातील सर्वच देशांच्या सर्वच क्षेत्रावर पडणार. प्रस्तूत लेखात भारत व भारतातील महाराष्ट्रातील मराठी भाषेवर व साहित्यावर या जागतिकीकरणाचा कसा प्रभाव पडलेला आहे याविषयी मांडणी करण्याचा प्रयत् केलेला आहे.

मराठी भाषा आणि साहित्यावर जागतिकीकरणाचा काय प्रभाव पडला हे समजून घेण्यासाठी आधी जागतिकीकरण म्हणजे काय? हे समजून घेतले पाहीजे. त्याचबरोबर जागतिकीकरणासोबत आलेले खाजगीकरण आणि उदारीकरण हे सुध्दा समजून घेणे गरजेचे आहे. जागतिकीकरण म्हणजे जगभरातील सर्व देशांच्या बाजारपेठा उदयोगपतीसांठी, व्यापारांसाठी आणि भांडवलदारांसाठी विनाअट खुल्या करून देणे होय. या संदर्भात जागतिक पातळीवर करारमदार झालेले आहेत. म्हणजे कोणत्याही देशातील माल कुढल्याही देशात विनाअट जावू शकेल. त्या त्या देशातील कंपन्यांना आपोआपच नफा मिळत राहील. म्हणूनच आज भारताच्या सर्व बाजारपेठांमध्ये चिनी वस्तूंनी धुमाकूळ घातला आहे. अगदी गणपती, देवांच्या मूर्ती, पतंग यासारख्या गोष्टीपासून मोटार सायकलीपर्यंत चिनी वस्तू बाजारपेठांमध्ये आहेत. इतर देशांमधील वस्तूही आहेतच किंबहुना परदेशी वस्तू ग्राहकांना प्रियही आहेत. परिणामी भारतीय उत्पादकांपुढे आणि तेथील कामगारांपुढे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. भारतीय भांडवलदारांनाही परदेशात आपला माल खपवायला परवानगी आहेच. ही तात्विक भूमिका मान्य् केली तरी भारतीय माल इतर देशात किती जातो याचा शोध घेतला पाहीजे. कारण गेल्या काही वर्षात डॉलरची किंमत फारच वाढत गेलेली आहे. तसेच भारततातील छोटे छोटे उदयोग संकटात आले आहेत असे सांगितले जाते. १ भारताचा विचार केला तर भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र स्वरूपाची आहे. याचा अर्थ मोठया मोठया उदयोगपतींच्या उदयोंगाबरोबरच शासनाचे काही उदयोगसुध्दा निर्माण केले जायचे. हळुहळु खाजगिकरण आणि उदारीकरणामुळे शासनाने आपले उदयोग मोठया उदयोगपतींना विकून टाकले. नंतर व्यक्तीच्या जीवनातील आवश्यक अशी बरीचशी क्षेत्रे उदयोगपतीसाठी खुली करून दिली. आज भारताची अवस्था अशी झाली आहे की, शिक्षणापासून तर मोठया मोठया उदयोगापर्यंत महत्वाची क्षेत्रे खाजगी लोकांच्या ताब्यात आली आहेत. विज्ञानातील विविध संशोधनामुळे बऱ्याच गोष्टी सोप्या झाल्या, पण कामगार मात्र देशोधडीला लागला. संगणकाच्या माध्यमातून बरीचशी कामे घरबसल्या होऊ लागली. अमेरीकेत किंवा जपानमध्ये बसून संकणकाव्दारे बरीचशी भारतातील कामे होतात. फायदा मात्र परदेशी कंपन्यांना. याचा अर्थ भांडवलदारांचे वर्चस्व् हळु हळु संपूर्ण जगावर पसरत आहे. सध्या भारतातील परीस्थिती काय आहे? भारताची सर्वात मोठी दुरसंचार कंपनी आज विक्रीस निघाली आहे, एअर इंडिया विक्रीस काढली जात आहे. म.रा.वि.म.चे खाजगिकरण झाल्यात जमा आहे. हा सर्व जागतिकीकरणाचाच प्रभाव आहे असे म्हणावे लागेल.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. पण शेती सुध्दा आज शेतकऱ्यांना परवडेनाशी झालेली आहे. बिबियाणांच्या भरमसाठ किमती व वाढ, नकली बियाणे, शेतीकाम करणाऱ्या कामगारांचा तुटवडा, लोडशेडींग, हे सर्व प्रश्न् जागतिकीकरणाशी संबधीत आहेत. हे लक्षात येईल.

मराठी भाषेवर सुध्दा जागतिकीकरणाचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. जागतिक भाषा म्हणून लोकांनी इंग्रजी भाषेचा स्विकार केला. इंग्रजी शाळा सुरू झाल्या. मराठी शाळांपुढे अनेक प्रश्न् निर्माण झाले. पण इथे एक महत्वाचा मुददा मांडावासा वाटतो की, जपान,चीन,जर्मनी,रशिया, फ्रान्स् यासारख्या जगातील प्रगत राष्ट्रांमध्ये इंग्रजीपेक्षा आपापल्या भाषेला, म्हणजे मातृभाषेला महत्वाचे स्थान आहे.मग हे आपण का करु शकत नाही. जागतिकीकरणाच्या रेटयात मराठी भाषेने आपले वर्चस्व् सिध्दा केलेले आहे. व्यक्तीची अस्मिता ही त्याच्या मातृभाषेमुळे टिकून राहते. मातृभाषेतून घेतलेले ज्ञानच माणसाला चांगले समजते. प्रत्येक मराठी माणसाने मराठी भाषेच्या वृध्दीसाठी प्रयत् करण्याची गरज आहे. प्रिंट मिडीया, प्रकाशन व्यवसाय, चित्रपट, इलेक्ट्रानिक मिडीया, रेडिओ, दूरदर्शन, अशा सर्वच क्षेत्रात मराठी भाषेच्या अभ्यासक, जाणकार व विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध् झालेली आहे.

बहुतेक चर्चा ही समाज माध्यमांच्या वाईट परीणामाबदलच दिसून येते. अर्था ते बहुतांशी बरोबर सुध्दा आहे. तथापी समाज माध्यमांचा विविध जनआंदोलनावर व विविध देशांच्या निवडणुकांवर जो अनपेक्षित परिणाम झालेला आहे त्याची सप्रमाण आकडेवारी व पुरावे आता समोर येत आहेत. तेव्हा समाज माध्यमांनी पारंपारिक प्रसार माध्यमांशी समांतर व काही हुकुमशाही मनोवृत्तीच्या देशात भूमीगत अशी लोकसंवादाची सोय उपलब्धा करुन दिली आहे. परंपरेने मुठभर लोकांच्या हाती लोकसंवादाची वर्तमानपत्रे, नियतकालीके व दुरचित्रवाणी आदि माध्यमे होती व ते या माध्यमांचा आपल्या हितसंबधाने व अनेक सत्ताधिशांच्या सोयीने वापर करत होते. अशा वेळी जनसामान्याच्या अभिव्यक्तीस अत्यंत मर्यादित वाव होता. अशा पारंपारिक ताबेदारांची मक्तेदारी नव्या तंत्रज्ञानाने मोडीत काढली आहे. जनसामान्यास माहितीच्या महाजालाचे दरवाजे व आपल्या मतांची स्पष्टोक्ती करण्याचे स्वातंत्र दिले आहे. याचा वापर अर्थातच सर्वजन विवेकाने करतील असे नाही. परंतु जनसामान्यांना अभिव्यक्तीचा विवेक येईपर्यंतच्या संक्रमणाचा हा काळ आहे.असे म्हणावे लागेल.६

अशोक कौतिक कोळी यांच्या पाडा या कादंबरीत सुध्दा केळी पिकविणाऱ्या चांगदेव तापीकरची अवस्था या जागतिकीकरणाच्या धोरणांमुळे किती भयावह झालेली आहे याचे चित्रण आलेले आहे. ही कादंबरी ग्रामिण असली तरी जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे नायकाच्या तोंडी लेखकाने बरेच इंगजी शब्दांचा वापर केलेला आहे. काही टेंशन हायको तुम्हच्या डोक्याले, दारापुढं ट्रॅक्स थांबली, लोडशेडींग बंद, झालंच पाहिजे, तु लई बॅरीस्टरीन वाया चाल्ली. यासारखे इंग्रजी शब्दाचा वापर लेखकाने केलेला आहे. ग्रामिण भागातील बरेच शब्दांचा लोप होत आहे. एका पुस्तकातील आकडेवारीनुसार उत्त अमेरिका कॅनडा आणि युनायटेड स्टेटस मधल्या भाषा १०० वर्षापूर्वी १७८ होत्या. आज ३८ भाषा उरल्या आहेत.. अलास्का मध्ये २७ भाषा होत्या आज तिथे दोन भाषा राहील्या आहेत. ही जागतिकीकरण करु ईच्छिणाऱ्या गोऱ्या लोकांची कर्तबगारी.७

जागतिकीकरणामुळे मराठी साहित्यापुढे बरीच आव्हाने उभी आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळा आणि महाविद्यालयांची वाढती संख्या, पाश्चात्य् संस्कृतीचे आक्रमण, बहुराष्ट्रीय कंपन्याचा इंग्रजीतून होणारा पत्रव्यवहार, मातृभाषेत बोलतांना सुध्दा इंग्रजी शब्दांचा होत चाललेला अतीवापर, माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मराठी भाषेला मिळत असणारे दुय्यम स्थान अशा विविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे करता येतील.

०१. शासन २७ फेब्रूवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करते, पंधरवाडा साजरा करते, कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी परिपत्रक काढते. जनतेनेही त्यात पूर्णपणे सहभागी होवून भाषेच्या उन्नातीसाठी प्रयत् करावेत, प्रत्येक वेळेला शासनाला दोष देत बसू नये.

०२. बोलीभाषा जीवंत राहील्या तरच मराठी भाषा मजबूत होईल. त्यामुळे बोलीभाषांच्या संवर्धनासाठी शासन व अभ्यासकांकडून प्रयत् होण्याची गरज आहे.

०३. मराठी भाषेचा अभ्यासक्रम हा व्यवहारोपयोगी, कौशल्याभिमुख, प्रेरणादाई असा निर्माण केला पाहीजे.

०४. कनिष्ठा स्तरावर व विदयापीठ स्तरावर सर्वच विदयाशाखांना मराठी विषय सक्तीचा करावा.

०५. दर्जेदार साहित्याची निर्मिती झाली पाहीजे, तसेच संशोधनाचा दर्जा चांगला असावा. बुध्दीवान विदयार्थी संशोधन क्षेत्राकडे वळावे यासाठी प्रोत्साहन दिले जावे.

०६. नव्या पीढीतील लेखकांनी ग्रामिण, आदिवासी, दलित, स्त्रीवादी, बालसाहित्या या सर्वच प्रकारात दर्जेदार लेखन केले पाहीजे. वाचकांमध्ये आवड निर्माण होईल अशी शब्दकळा निर्माण केली पाहिजे.

उपरोक्त् सुचविलेले उपाय हे अंतिम आहेत असे नाही. तसेच या संशोधनपर लेखातील विचार अंतिम आहेत असेही नाही.

संदर्भ सुची:-


०१. जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव सं.वले वासुदेव पृ.१०

०२. जागतिकीकरणात माझी कविता (आमची श्रीवाणी) उत्त्म कांबळे पृ.८३

०३. जागतिकीकरणात माझी कविता उत्त्म कांबळे पृ.८८

०४. सायरनचे शहर काळे अरुण पृ

०५. नंतर आलेले लोक काळे अरुण पृ.३९

०६. विचारांचे अमृतकण: व्हॉटसपायन, गायकवाड भास्क्र मलपृष्ठ

०७. साहित्य् संस्कृती आणि जागतिकीकरण, नेमाडे भालचंद्र पृ.१८